**(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )**

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायधिकारात**

**सर्वसाधारण मूळ दिवाणी अधिकारिता**

लवाद याचिका क्रमांक ३५५/२०२२ सह

लवाद याचिका क्रमांक ३५५/२०२२ मध्ये

अंतरीम अर्ज क्र. ३१८८/२०२२

जॉन पीटर फर्नांडिस .... याचिकाकर्ता/अर्जदार

विरुद्ध

सरस्वती रामचंद्र घनाटे, मयत आणि इतर .... उत्तरवादी

सोबत लवाद याचिका क्रमांक (एल) क्र. २४२१७/२०२२

सह

लवाद याचिका (एल) क्र. २४२१७/२०२२ मध्ये

अंतरीम अर्ज (एल) क्र. २४२२३/२०२२

रमाकांत रामचंद्र घनाते ... याचिकाकर्ता/अर्जदार

विरुद्ध

जॉन पीटर फर्नांडिस आणि इतर ... उत्तरवादी

श्री संतोष पॉल, ज्येष्ठ वकील, एम शेट्टी आणि श्रीमती अंजली गुप्ता रावल शहा आणि कंपनी यांच्या सूचनेवरून लवाद याचिका ३५५/२०११ मधील याचिकाकर्ता / अर्जदारांकरिता आणि लवाद याचिका २४२१/ २०२२ मधील उत्तरवादी क्र. १ करिता.

श्री अनंत जोशी सह श्री निखिल मिश्रा लवाद याचिका ३५५/२०२२ मधील उत्तरवादी क्र. २ करिता आणि लवाद याचिका २४२१७/२०२२ मधील अर्जदारांकरिता.

**न्यायमंच : मनिष पितळे, न्यायाधीश**

**दिनांक : २३ मार्च २०२३**

**न्यायनिर्णय आणि आदेश :**

लवाद कार्यवाहीतील दोन्ही पक्षकार दिनांक ३१ मार्च, २०२२ च्या आक्षेपित निवाड्यामुळे व्यथित झाले आहेत. लवाद याचिका क्र. ३५५/२०२२ मधील याचिकाकर्ता दिनांक ६ ऑक्टोबर, २००३ रोजीच्या कराराची विनिर्दिष्ट पूर्तता करण्याची प्रार्थना नाकारल्यामुळे व्यथित झाले आहेत. तर लवाद याचिका (एल) क्र. २४२१७/ २०२२ मधील अर्जदार प्रतिस्पर्ध्याकडून मिळालेली रक्कम रुपये ६,५०,०००/- ही द.सा.द.शे. ८ % व्याजासह परत करण्याच्या आक्षेपित निवाड्यातील निर्देशांमुळे व्यथित झाले आहेत.पक्षकरांमधील वाद दिनांक ६ ऑक्टोबर, २००३ रोजीच्या नोंदणीकृत कराराशी संबंधित आहे, ज्याची कलमे या याचिकांमध्ये विचार करण्यासाठी येतात.

२) या दोन याचिका दाखल करण्यामागे थोडक्यात तथ्ये अशी आहेत की, लवाद याचिका क्र. ३५५/ २०२२ मधील याचिकाकर्ते जॉन पीटर फर्नांडिस (यापुढे श्री. फर्नांडिस म्हणून संदर्भित करण्यात आले आहे) सदर याचिकेतील उत्तरवादी क्रमांक १ आणि २ बरोबर करार केला, ज्याद्वारे श्री. फर्नांडिस यांनी रेस्टॉरंट उघडण्याच्या उद्देशाने विषयांकित मालमत्ता उत्तरवादिंकडून खरेदी करण्यास करार केला.असे नमूद केले आहे की, श्री. फर्नांडिस हे वेटर म्हणून काम करत होते आणि त्यांनी मोबदल्याचा काही भाग त्यांच्या नातेवाईकांकडून आणि उरलेल्या भागाची व्यवस्था सहकारी बँकेकडून कर्जाच्या स्वरूपात केली होती.ठरवलेला मोबदला हा रुपये

३५,००,०००/- एवढा होता. दिनांक ६ ऑक्टोबर, २००३ चा करारनामा नोंदणीकृत होता आणि जरी हे नोंदविले गेले होते की, संपूर्ण रक्कम अदा करण्यात आली होती, तरीही पक्षकारांमध्ये हे सामायिक कारण आहे की, मोबदल्याचा फक्त काही भाग अदा करण्यात आला होता आणि उर्वरित रक्कम देय होती.सदर कराराच्या संदर्भात त्यांच्यात नेमकी किती रक्कम हस्तांतरित झाली याबाबत दोन्ही पक्षकारांमध्ये वाद आहे.

३) असे असले तरी, श्री. फर्नांडिस यांचे प्रकरण असे होते की, सदरचा करार निष्पादीत झाल्यानंतर, ज्या अंतर्गत पक्षकारांची आपापली जबाबदारी होती, जेव्हा ते जून, २००४ मध्ये आपलय गावाहून परत आले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, उत्तरवादी विषयांकित मालमत्तेत व्यवसाय करत होते.या पार्श्वभूमीवर, श्री. फर्नांडिस यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २००३ रोजीच्या कराराची विनिर्दिष्ट पूर्तता करण्यासाठी, तसेच तो करार अस्तित्वात असल्याचे जाहीर करण्याची मागणी केली आणि उत्तरवादी यांना उर्वरित मोबदल्याची रक्कम स्वीकारण्याचे निर्देश देण्यासाठी व मालमत्ता श्री. फर्नांडिस यांच्या ताब्यात देण्यासाठी दावा क्रमांक २४१२/२००४ दाखल केला.अंतरिम दिलासा देण्यासाठी नोटीस ऑफ मोशन सादर करण्यात आले होते परंतु, ते फेटाळण्यात आले. एक अपील दाखल करण्यात आले, ज्यामध्ये पक्षकारांमध्ये समझोत्याच्या अटी बनविण्यात आल्या आणि दोन्ही पक्षकारांमधील लवादाकडे पाठवून अपील निकाली काढण्यात आले.

४) दिनांक १५ जुलै, २००५ रोजी श्री. फर्नांडिस यांनी त्यांच्या दाव्याचे विवरणपत्र दाखल केले, ज्याला उत्तरवादीने विरोध केला आणि परिणामी दिनांक ३ फेब्रुवारी, २००६ च्या निवाड्याने लवाद न्यायाधिकरणाने सदर रक्कम खरोखरच उत्तरवादींना कराराच्या अनुषंगाने प्राप्त झाले असेलच, असा निष्कर्ष काढून, उत्तरवादींनी श्री. फर्नांडिस यांना रक्कम रुपये ११,५०,०००/- द.सा.द.शे. १८% व्याजाने देण्याचे निदेश दिले.

५) उत्तरवादींनी लवाद आणि सामंजस्य कायदा, १९९६, च्या कलम ३४ अन्वये याचिका दाखल करून उक्त निवाड्याला आव्हान दिले.दिनांक ८ नोव्हेंबर २००६ रोजी याचिका दाखल करून घेण्यात आली होती आणि लवाद निवाडा रद्द करण्यात आला होता. त्यामुळे व्यथित होऊन, श्री. फर्नांडिस यांनी सदर अधिनियमाच्या कलम ३७ अंतर्गत अपील दाखल केले आणि दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी खंडन्यायपीठाने सदर अधिनियमाच्या कलम ३४ अन्वये याचिकेवर नव्याने सुनावणी घेण्यासाठी प्रकरण परत एकल न्यायाधीशाकडे पाठवले. १२ डिसेंबर, २०१८ रोजी विद्वान एकल न्यायाधीशांनी आणखी एक लवाद न्यायाधिकरण स्थापन केले, परंतु विनिर्दिष्टपूर्वक निर्देश दिले की, याचिकाकर्त्याच्या रुपये ११,५०,०००/- च्या दाव्याच्या हक्कदारीपुरता संदर्भ मर्यादित राहील. दोन्ही पक्षकारांनी पुनर्विलोकन अर्ज दाखल केले, जे फेटाळण्यात आलेत.

६)		श्री फर्नांडिस यांनी सदर अधिनियमाच्या कलम  ३७ अंतर्गत अपील  दाखल केले आणि या न्यायालयाच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, आता स्थापन करण्यात आलेले लवाद न्यायाधिकरण या संदर्भातील सर्व वादांचा विचार करेल.त्या अनुषंगाने या न्यायालयात सराव करणाऱ्या वकिलाचा समावेश असलेल्या लवाद न्यायाधीकरणाची स्थापना करण्यात आली आणि विद्वान लवादाने लवाद  कार्यवाही सुरू  केली.

७)		प्रतिस्पर्धी पक्षकारांनी आपले म्हणणे अभिलेखावर ठेवले.  विद्वान लवादाने ३१ मार्च, २०२२ रोजी  आक्षेपित  निवाडा पारित केला आणि श्री. फर्नांडिस  यांची  दिनांक १६ ऑक्टोबर, २००३ च्या कराराची विनिर्दिष्ट पूर्तता करून देण्यासाठीची प्रार्थना  फेटाळली,  परंतु, प्रतिवादी यांना (सोबतच्या लवाद याचिका (एल) क्र.  २४२१७/२०२२ मधील अर्जदार) श्री. फर्नांडिस यांना रक्कम रुपये ६,५०,०००/- द.सा.द.शे. ८% सरळव्याजासह  देण्याचे निर्देश दिले. विद्वान लवादाला आढळले की, श्री.  फर्नांडिस हे करारातील त्यांची भूमिका पार पाडण्याची तयारी आणि इच्छा सिद्ध करण्यास अपयशी ठरले आणि उत्तरवादीने रक्कम रुपये ५,००,०००/- रोखीने  दिल्याचे कथन हे ठोस पुराव्याने सिद्ध झालेले नव्हते. या कारणास्तव, विद्वान लवादाने वरील रक्कम रुपये ५,००,०००/-  ही रक्कम रुपये ११,५०,०००/- मधून वजा करून आणि उत्तरवादींनी श्री फर्नांडिस यांना रुपये ६,५०,०००/- द.सा.द.शे.  ८% सरळव्याजाने देण्याचे

निर्देश दिले. सदर निवाड्याने व्यथित होऊन, प्रतिस्पर्धी पक्षकारांनी या याचिका या न्यायालयासमोर दाखल केल्या आहेत.दोन्ही याचिका प्रतिस्पर्धी पक्षकारांच्या विद्वान वकिलांच्या संमतीने अंतिम निकालासाठी घेण्यात आल्या.

८) श्री. फर्नांडिस यांचे विद्वान ज्येष्ठ वकील श्री संतोष पॉल यांनी सादर निवेदन केले की, ते मुंबईतील ब्रिच कँडी स्विमिंग बाथ ट्रस्ट मध्ये वेटर म्हणून काम करणारे साधारण उत्पन्न वर्गातील व्यक्ती होती आणि विषयांकित जागेत 'खाना खजाना' नावाचे रेस्टॉरंट सुरू करण्याचा त्यांचा हेतू होता.असे सादर करण्यात आले की, श्री. फर्नांडिस यांनी मोठ्या कष्टाने त्यांच्या नातेवाईकांकडून कर्ज घेऊन काही रकमेची व्यवस्था केली आणि उत्तरवादिंना देण्यासाठी रक्कम रुपये ११,५०,०००/- जमा केले.असा दावा करण्यात आला की, सदर रकमेची व्यवस्था केल्यावर, श्री. फर्नांडिस यांनी आणखी रक्कम रुपये २५,००,०००/- ची व्यवस्था सहकारी बँकेकडून कर्ज घेऊन केली.दिनांक ६ ऑक्टोबर, २००३ रोजीच्या नोंदणीकृत कराराच्या अनुषंगाने निष्पादीत करावयाचे नोंदणीकृत खरेदी खत सादर केल्यावरच कर्जाचे वितरण केले जाणार होते.विद्वान जेष्ठ वकिलांनी सादर केले की, जेव्हा श्री. फर्नांडिस यांना मुंबई सोडून त्यांच्या मूळ गावी त्यांच्या आजारी आईला भेटण्यासाठी जावे लागले, तेव्हा उत्तरवादी यांचे मन बदलले आणि त्यांनी त्या कराराचे पालन न करण्याचे ठरवले.

९)  आपल्या मूळ गावावरून परत आल्यावर, श्री. फर्नांडिस यांना उत्तरवादींच्या हेतूची जाणीव झाली, ज्यामुळे त्यांनी वर नमुद केलेला दावा दाखल केला आणि बरीच वर्ष प्रकरणाचा पाठपुरावा केल्यानंतर आक्षेपित निवाडा पारित करण्यात आला. विद्वान जेष्ठ वकील यांनी सादर  निवेदन केले की,  विद्वान लवादाने उत्तरवादिंना रोखीनी रक्कम रुपये ५,००,०००/- अदा केली, या गोष्टीवर विश्वास न ठेवून गंभीर चूक केली.त्यांनी असे सादर  निवेदन केले की, विद्वान लवादाने अभिलेखावर ठेवलेल्या पावत्यांच्या आधारे रोखीने भरलेल्या इतर रकमांवर विश्वास ठेवून फक्त  रोखीने भरलेल्या रुपये ५,००,०००/- च्या रकमेवर अविश्वास ठेवला, कारण पावती मध्ये उत्तरवादींना सदर रक्कम धनादेशाद्वारे प्राप्त झाली होती, असे नोंदविले होते.पुढे असे सादर निवेदन करण्यात आले की, श्री. फर्नांडिस यांनी पावतीमध्ये धनादेशाद्वारे रक्कम प्रदान केल्याचे नोंदविले गेले, तर प्रत्यक्षात प्रदान रोख रकमेद्वारे केले आहे, हे स्पष्ट करण्यासाठी पुरेशी सामग्री अभिलेखावर ठेवली.पुढे असे सादर निवेदन करण्यात आले की, सहकारी बँकेने जारी केलले एक पत्र हा  अभिलेखाचा भाग होता, ज्यात, असे दर्शविले होते की, रक्कम रुपये २५,००,०००/- चे कर्ज खरेदीखताच्या निष्पादनानंतर वितरीत करण्यासाठी तयार आहे आणि म्हणूनच विद्वान लवादाने तयारी आणि इच्छा या पैलूंवर दिलेले निष्कर्ष विपर्यस्त आणि न टिकण्याजोगे आहेत.अशा परिस्थितीत, विद्वान जेष्ठ वकील सादर  निवेदन करतात की, विनिर्दिष्ट पूर्तता करण्यासाठीची प्रार्थना नाकारणे आणि त्याऐवजी श्री. फर्नांडिस यांना काटछाट केलेली रक्कम परत करणे, हे विद्वान लवादाने केलेली चूक दर्शवते.

१०)  विद्वान जेष्ठ वकिलांनी ओएनजीसी वि. सॉ पाईप्स लिमिटेड **(२००३) ५ एससीसी ७०५** या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवण्याची मागणी केली. परंतु जेव्हा त्यांना सांगितले गेले की, उपरोक्त अधिनियमात सुधारणा केल्यानंतर संगयाँग इंजीनियरिंग अँड कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड वि. नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडिया **(२०१९) १५ एससीसी १३१** मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केल्याप्रमाणे कायद्याची स्थिती बदललेली आहे, तेव्हा विद्वान जेष्ठ वकीलांनी प्रामाणिकपणे सादर निवेदन केले की, सर्वोच्च न्यायालयाने आता स्पष्ट केलेल्या कायद्याच्या स्थितीच्या आधारेच निवाड्याची कसोटी घेतली जाऊ शकते.पुढे असे सादर निवेदन करण्यात आले की, जरी प्रस्तुत प्रकरणातील बाबींना सदर कसोटी लागू करायची असल्यास महत्त्वाच्या पुराव्याकडे दुर्लक्ष करून निष्कर्ष अवास्तव दृष्टिकोनावर आधारित असल्यामुळे, दिलेला निवाडा हा स्पष्टपणे बेकायदेशीर आहे असे म्हटले जाऊ शकते. या आधारावर, श्री. फर्नांडिस यांच्यावतीने उपस्थित असलेल्या विद्वान जेष्ठ वकील यांनी सादर निवेदन केले की, त्यांची याचिका मंजूर करण्यास पात्र आहे.उत्तरवादी यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या संदर्भात असे सादर करण्यात आले की, त्यात काहीही तथ्य नव्हते, कारण कायद्यातील दुरुस्तीनंतर लवाद निवाडा रद्द करण्यासाठी आता उपलब्ध असलेल्या कायद्याचे कोणतेही मापदंड उत्तरवादिंस आक्षेपित निवाड्यातील निदेश क्रमांक II आव्हान देण्यासाठी लागू करू शकत नाही, या आधारावर असे सादर करण्यात

आले होते की, लवाद  याचिका क्रमांक ३५५/२०२२ मंजूर करून घेण्यास पात्र आहे आणि लवाद याचिका (एल) क्रमांक २४२१७/ २२ खारीज करण्यात यावी.  या आधारावर असे सादर करण्यात आले होते की, लवाद  याचिका क्रमांक ३५५/२०२२ मंजूर करून घेण्यास पात्र आहे आणि लवाद याचिका (एल) क्रमांक २४२१७/ २२ खारीज करण्यात यावी.

११) दुसरीकडे, फर्नांडिस यांनी दाखल केलेल्या याचिकेतील मूळ उत्तरवादी आणि लवाद याचिका (एल) क्रमांक २४२१७/२०२२ मधील अर्जदार यांच्यावतीने उपस्थित होणाऱ्या विद्वान वकील श्री अमृत जोशी यांनी सादर निवेदन केले की,  उत्तरवादींनी रक्कम रुपये ६,५०,०००/-  दरसाल ८ टक्के सरळव्याजासह दयावी, असे आक्षेपित निवाड्यात दिलेले दुसरे निदेश हे पूर्णपणे न टिकण्याजोगे होते आणि सदर निदेशाचा संबंध होता तेवढ्यापुरता  निवाडा अंशतः रद्द करण्यास पात्र होता.पुढे असे सादर निवेदन करण्यात आले की, उर्वरित निवाडा कायम ठेवण्यास पात्र होता.विद्वान वकिलांनी पृथकरणीयतेचा सिद्धांत या न्यायालयाद्वारे लागू केला जाऊ  शकतो आणि केवळ आक्षेपित निवाड्यात दिलेला दुसरा निदेश रद्द केला जाऊ शकतो हे सादर करताना या न्यायालयाच्या पूर्ण न्यायपीठाचा आर.एस. जिवाणी वि.  इरकाँन इंटरनॅशनल लिमिटेड,  **२०१० *(१)* एमएच. एल.जे. ५४७** या प्रकरणात दिलेल्या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे.

१२)		पुढे असे सादर निवेदन करण्यात आले की, प्रस्तुत प्रकरणात विद्वान लवादाला असे आढळूनआले की, उत्तरवादीच्या बाजूने कोणताही भंग झालेला नव्हता आणि श्री फर्नांडीस हे तयारी आणि इच्छा दाखवण्यात अयशस्वी झाल्यामुळे त्यांना पैसे परत करण्याचा निदेश देता आला नाही.पुढे असे सादर निवेदन करण्यात आले की, पक्षकारांमधील संबंध दिनांक ६ ऑक्टोबर २००३ च्या करारातील कलमांनी शासित होते आणि विद्वान लवाद करारांच्या अटीपलीकडे जाऊ शकले नाहीत. विद्वान वकील यांनी दोन्ही बाजू (पक्षकारां) कडून करारांच्या अटींच्या भंगानंतर होणाऱ्या परिणामांच्या संबंधी असलेल्या कराराच्या कलमांचा आधार घेतला आहे.त्यांनी नमूद केले की, कराराच्या अटी विनिर्दिष्ट होत्या आणि एकदा का विद्वान लवाद यांच्या निर्दशनासं आले की, श्री. फर्नांडिस यांनी खरेदीदार म्हणून चूक केली (दोषी आहेत), अशा प्रसंगी रकमेचे समपहरण हा एकच परिणाम होता.रकमेच्या परताव्या संबंधी निदेश करारांच्या अटीमध्ये नमूद आहेत, त्यानुसार असे दिसून येते की लवाद निवाड्याने कायद्याच्या विपरीत भूमिका घेतली, त्याचे स्पष्टीकरण **साँगयोंग इंजिनिअरिंग आणि कन्स्ट्रक्शन वि नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया** (उपरोल्लेखित) च्या प्रकरणात, सदर अधिनियमाच्या दुरुस्ती पश्चात, सर्वोच्च न्यायालयाने केले आहे.

१३) विद्वान लवादाने आक्षेपित निवाड्यातील दुसऱ्या निदेशाच्या संदर्भात दिलेला निष्कर्ष हा विपर्यस्त होता आणि म्हणून त्या प्रमाणात निवाडा हा उघडपणे अवैध आहे असा युक्तिवाद

मांडताना उत्तरवादी यांच्या वकीलांनी युनियन ऑफ इंडिया वि. रेकॉन मुंबई, **२०२० (६) एमएच. एल. जे. ५०९** या प्रकरणात या न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे.करारातील विशिष्ट अटींच्या विरोधात जाऊन आक्षेपित निदेश देऊन विद्वान लवादाने त्यांच्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादेपालिकडे जाऊन कार्य केले आहे असा युक्तिवाद मांडताना विद्वान वकिलांनी या न्यायालयाने विलायती राममित्तल प्रा. लि. वि. रिझर्व बँक ऑफ इंडिया **२०१७ एससीसी ऑनलाइन बॉम ८४७९** या प्रकरणात दिलेल्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे.विद्वान लवादाने श्री फर्नांडिस यांच्या बाजूने समन्यायाच्या तत्त्वासाठी प्रार्थना करू शकले नाहीत, हा युक्तिवाद मांडताना विद्वान वकीलानी या न्यायालयाने बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया बी डेक्कन क्रोनिकल होल्डिंग लिमिटेड **२०२१ एस सी सी ऑनलाईन बॉम्बे ८३४** या प्रकरणात दिलेल्या न्याय निर्णयावर भिस्त ठेवली आहे.सन २०१५ मध्ये अधिनियमातील दुरुस्तीच्या माध्यमातून दाखल करण्यात आलेल्या कलम २ (८३) चा संदर्भ देण्यात आला, ज्याद्वारे विद्वान लवादाला व्यवहारांना लागू असलेल्या कराराच्या अटी आणि व्यापार वापराचा विचारात घेणे अनिवार्य केले गेले आणि पुढे अधिनियमाच्या कलम २८ (२) अंतर्गत विद्वान लवाद केवळ पक्षकारांनी त्याला स्पष्टपणे अधिकृत केले तरच जे उचित आणि चांगले आहे किंवा जे योग्य आहे आणि चांगले आहे या आधारावर निश्चित निर्णय घेऊ शकतो.अशा अधिकाराच्या अनुपस्थितीत विद्वान लवादाने त्यांच्या अधिकारक्षेत्राच्या पलीकडे कार्य केले होते.या आधारावर असे सादर निवेदन केले गेले की लवाद याचिका क्रमांक ३५५/२०२२ रद्द करण्यास पात्र आहे आणि लवाद

याचिका (एल) क्र. २४२१७/२०२२ मंजूर करण्यात यावी, जेणेकरून लवाद निवाडा अंशतः रद्द ठरवता येईल. विरोधी पक्षांच्या वतीने आक्षेपित युक्तिवादांचा विचार करण्यापूर्वी, या कायद्याच्या कलम ३४ अंतर्गत या न्यायालयाला उपलब्ध असलेल्या अधिकार क्षेत्र संदर्भात कायद्याच्या स्थितीचा संदर्भ घेणे योग्य ठरेल.हे महत्त्वाचे आहे की सध्याच्या प्रकरणात, दोन्ही पक्ष या न्यायालयासमोर आहेत आणि आक्षेपित निर्णयाला आव्हान देत आहेत. २३ ऑक्टोबर २०१५ पासून या कायद्यात सुधारणा करून, या कायद्याच्या कलम ३४ मध्ये विशिष्ट बदल करण्यात आले, ज्याद्वारे न्यायालयांकडून या तरतुदीत वाचले जाणारे व्यापक अधिकार क्षेत्र क्षेत्र संकुचित करण्यात आले आणि लवाद निकालांमध्ये हस्तक्षेपाची व्याप्ती मर्यादित करण्यासाठी 'भारताचे सार्वजनिक धोरण' आणि 'पेटंट बेकायदेशीर' यासारख्या वाक्यांना स्पष्ट करण्यात आले.असोसिएट बिल्डर्स विरुद्ध दिल्ली विकास प्राधिकरण (२०१५) ३ एससीसी ४९ आणि दुरुस्तीनंतर सर्वोच्च न्यायालयाने सांगयोंग इंजिनिअरिंग अँड कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड विरुद्ध नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया (उपर्युक्त) प्रकरणात कायद्याची स्थिती स्पष्ट केली.हा न्यायालय युनियन ऑफ इंडिया वि. रेकॉन, मुंबई (उपर्युक्त) प्रकरणात, कायद्यातील सुधारणा आणि सँगयोंग इंजिनिअरिंग अँड कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड वि. नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया (उपर्युक्त) प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा विचार करून खालील प्रमाणे निर्णय देईलः- -

१४) प्रतिस्पर्धी पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेल्या युक्तिवादांचा विचार करण्यापूर्वी आणि आक्षेपित लवाद निवाड्यास उपस्थित केलेल्या आव्हानाचा विचार करतांना, सदर कायद्याच्या कलम ३४ अंतर्गत या न्यायालयास उपलब्ध असलेल्या अधिकार क्षेत्राबाबत कायद्याच्या स्थितीचा संदर्भ घेणे योग्य ठरेल.. हे महत्त्वाचे आहे की, प्रस्तुत प्रकरणात या न्यायालयासमोरील दोन्ही पक्षकार हे आक्षेपित निवाड्यास आव्हानित करत आहेत.

१५) दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ पासून उपरोक्त कायद्यात करण्यात आलेल्या दुरुस्तीद्वारे, सदर कायद्याच्या कलम ३४ अंतर्गत काही विशिष्ट बदल करण्यात आले आहेत, ज्याद्वारे न्यायालयांकडून सदर तरतुदीत वाचली जाणारी विस्तृत अधिकारिता संकुचित करण्यात आली आणि लवाद निकालांमध्ये हस्तक्षेपाची व्याप्ती मर्यादित करण्यासाठी 'भारताचे सार्वजनिक धोरण' आणि 'उघड अवैधता' यांसारखे शब्दप्रयोग स्पष्ट करण्यात आले.कायद्याची स्थिती जशी ती सदर कायद्यामध्ये दुरुस्ती होईपर्यंत अंमलात होती, यावर, माननीय सर्वोच्च न्यायालयाने असोसिएट बिल्डर्स विरुद्ध दिल्ली डेव्हलपमेंट ऑथॉरिटी **(२०१५) ३ एससीसी ४९,** या प्रकरणात दिलेल्या न्यायनिर्णयात सविस्तर चर्चा करण्यात आली व विशद करण्यात आले आणि दुरुस्तीनंतर माननीय सर्वोच्च न्यायालयाने **संगयाँग इंजिनिअरिंग आणि कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड विरुद्ध नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये कायद्याची स्थिती स्पष्ट केली आहे. या न्यायालयाने **युनियन ऑफ इंडिया विरुद्ध रेकाँन, मुंबई** (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये कायद्यातील दुरुस्ती आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाने

संगयाँग इंजिनिअरिंग आणि कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड विरुद्ध नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडिया (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये दिलेला निर्णय विचारात घेतल्यानंतर, खालील प्रमाणे निर्णय दिला की :-

"१७.४ यामध्ये खालील परिणाम दिसून येतात.

(i) न्यायिक दृष्टिकोनाचा अभाव आणि वेस्टर्न गेकोचा विस्तार असल्याने ते स्वतःच एक आव्हानित करण्यासाठी कारण म्हणून उपलब्ध होत नाही.

(ii) नैसर्गिक न्याय तत्त्वांचे उल्लंघन हे आव्हानित करण्यासाठी कलम १४ सह कलम ३४ (२) (अ) (iii) अंतर्गत एक कारण आहे - म्हणजेच ते 'मूलभूत धोरण' किंवा 'उघड अवैधता' या शिर्षाखाली नाही परंतु, सुस्पष्टपणे या पोट कलमाच्या अंतर्गत आहे.

(iii) कलम ३४ (२अ) अंतर्गत कारणांचा अभाव ही उघड अवैधता आहे.

(iv) कराराचा अर्थ लावतांना, लवादाचा दृष्टिकोन हा निष्पक्ष आणि वाजवी असला पाहिजे. जर असे मत असेल जे अगदी शक्य नाही किंवा जर लवाद हा कराराच्या पलीकडील असेल तर ते 'उघड अवैधता' असे असेल.

(v) असोसिएट बिल्डर्स या प्रकरणामध्ये ‘विपर्यास’ असे समजले गेलेप्रमाणे आता ते ‘मूलभूत धोरण’ (जेथे वेस्टर्न गेकोने मांडले आहे) यामधून वगळले आहे आणि आता ते ‘उघड अवैधता’ या संज्ञेमध्ये नमूद आहे. यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो :-

(अ) कोणत्याही पुरावावर आधारित नसलेले निष्कर्ष ;

(ब) महत्त्वाच्या पुराव्यांकडे दुर्लक्ष करणारा निवाडा ; आणि

(क) पक्षकारांच्या अनुपस्थितीमध्ये घेतलेल्या कागदपत्रांवर आधारित काढलेले निष्कर्ष.

मला असे वाटते की ही एक परिपूर्ण यादी नाही.

उपरोक्त (iv) आणि (v) यांची सांगड घालता, वेन्सबरी अवास्तवता मानक (वेस्टर्न गेको मध्ये मांडल्याप्रमाणे) ची स्पष्ट ओळख किंवा स्वीकृती करणे शक्यतो नाहीसे केले गेले आहे. तरीही, कराराच्या अर्थाच्या बाबतीत वाजवीपणा आणि तर्कशुद्धतेची आवश्यकता आहे.जर संविदेचा अर्थविष्कार हा सर्वतोपरी अयुक्तिक आणि संपूर्णतया अकल्पनीय असेल - जो दृष्टिकोन स्वीकारला आहे तो शक्य देखील नाही - तर ते एक आव्हान आहे.म्हणून एखादा निवाडा, जो त्याच्या निर्मितीमध्ये (महत्त्वाच्या

पुराव्याकडे दुर्लक्ष करून किंवा कोणत्याही पुराव्यावर आधारित नसलेला, इत्यादी) किंवा त्याच्या परिणामामध्ये (संपूर्णतया अशक्य अशा निष्कर्षाकडे परत येणे) अशक्य होता, तर 'विपर्यस्ततेच्या' कारणास्तव आव्हान, हे 'उघड अवैधतेचे' परिणाम म्हणून कलम ३४ (२ अ) अंतर्गत येते.

१६) अशाप्रकारे, वरीलप्रमाणे स्पष्ट केलेल्या अधिकारक्षेत्राच्या कसोटीवर प्रतिस्पर्धी यांनी केलेल्या युक्तिवादांवर निर्णय देणे आवश्यक आहे.तसेच, या न्यायालयाच्या पूर्ण न्यायपीठाने **आर. एस. जिवानी विरुद्ध इरकॉन इंटरनॅशनल लिमिटेड** (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये दिलेल्या न्यायनिर्णयाचा देखील संदर्भ या कारणासाठी घेणे प्रस्तुत आहे की, उत्तरवादी यांनी विनिर्देशपूर्वक त्यांमधील स्पष्ट केलेल्या कायद्याच्या स्थितीला असा दावा करण्यासाठी आव्हानित केले आहे की, उत्तरवादी यांना विशिष्ट रक्कम व्याजासह परत करण्यासाठी निर्गमित केलेले दुसरे निर्देश निर्बंधित करून आक्षेपित निवाडा हा अंशतः रद्द केला जाऊ शकतो. असे सादर करण्यात आले की, श्री. फर्नांडिस यांनी केलेली विनिर्दिष्ट पालनासाठीची प्रार्थना फेटाळून आक्षेपित निवाड्यातील प्रथम निष्कर्ष किंवा निर्देश हे पुष्टी देण्यास आणि कायम करण्यास पात्र आहेत.या न्यायालयाच्या पूर्ण न्यायपीठाने **आर. एस. जिवानी विरुद्ध इरकॉन इंटरनॅशनल लिमिटेड** (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने मॅक डरमॉट इंटरनॅशनल आयएनसी विरुद्ध बर्न स्टॅंडर्ड कंपनी लिमिटेड आणि इतर, **(२००६) ११ एससीसी**

**१८१,** या प्रकरणात दिलेला न्यायनिर्णय विचारात घेतला, ज्यामध्ये असे निर्धारित केले होते की, सदर कायद्याच्या कलम ३४ अन्वये न्यायालय हे केवळ निवाडा रद्दबातल करू शकते आणि जर पक्षकारांची इच्छा असल्यास पक्षकारांना लवाद पुन्हा सुरू करण्यासाठी मुभा देऊ शकते. परंतु, या न्यायालयाच्या पूर्ण न्यायपीठास सदर न्यायनिर्णयामध्ये असे आढळले की, जोवर आक्षेपार्ह भाग वेगळा केला जाऊ शकतो, तोवर लवाद देण्यासाठी निश्चितच पृथक्करणीयतेचे तत्व लागू केले जाऊ शकते.या न्यायालयाची खात्री पटली आहे की, उत्तरवादी हे सदर न्याय तत्वास आव्हान देणे हे उचित समजतात आणि त्यांचे असे म्हणणे की, जर त्यांचा युक्तिवाद मान्य केला तर, आक्षेपित निवाडा हा अंशतः रद्द केला जाऊ शकतो.पण, यामुळे विद्वान लवादाच्या चुकांमध्ये सुधारणा किंवा दुरुस्ती होणार नाही.या पार्श्वभूमीवर, लवाद निवाड्याचे परीक्षण हे प्रतिस्पर्धी पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेल्या युक्तिवादांच्या संदर्भात केले जाणे आवश्यक आहे.

१७) दिनांक ०६ ऑक्टोबर, २००३ रोजीच्या नोंदणीकृत कराराचे विनिर्दिष्ट पालन करण्यासाठी केलेल्या प्रार्थनेच्या पार्श्वभूमीवर, श्री. फर्नांडिस यांच्या तयारी आणि इच्छेच्या प्रश्नावरून विद्वान लवादास असे आढळले की, श्री. फर्नांडिस यांचा उत्तरवादी यांना रक्कम रुपये ११,५०,०००/- अदा केल्याचा दावा उचित नव्हता. सदर निष्कर्षापर्यंत पोहोचतांना, विद्वान लवादाने अभिलेखावरील पुरावे विचारात घेतले ज्यामध्ये, अभिलेखावर सादर केलेल्या पावत्यांचा देखील समावेश होता आणि त्यांना असे आढळले की, रक्कम रुपये ६,५०,०००/- ही

अदा करण्यात आली होती; रुपये १,५०,०००/- ही धनादेशद्वारे अदा केली आणि उर्वरित रक्कम ही विविध तारखांना रोखीने अदा केली होती. विद्वान लवादास विशेषतः असे आढळले की, रक्कम रुपये ५,००,०००/- शी संबंधित पावती असे दर्शविते की, सदर रक्कम ही बँक ऑफ इंडिया मधून विशिष्ट क्रमांक असलेल्या धनादेशद्वारे अदा केली आहे. विद्वान लवादाने अभिलेखावर असलेले पुरावे देखील विचारात घेतले आणि त्यांना असे आढळले की, श्री. फर्नांडिस यांनी असे मान्य केले होते की, सदर निशाणी - १४ वरील पावती ही धनादेश अदा केल्याच्या संदर्भात होती, जो उत्तरवादी क्रमांक २ यांनी कधीही वटवला नाही. विद्वान लवादास असे देखील आढळले की, श्री. फर्नांडिस यांनी उलटतपासणीत कबूल केले की, त्यांच्या शब्दाव्यतिरिक्त, उत्तरवादींना रक्कम रुपये ५,००,०००/- ही रोखीने अदा करण्यात आली होती, हे सिद्ध किंवा प्रस्थापित करण्यासाठी अभिलेखावर कोणतेही पुरावे नाहीत. खरंतर, विद्वान लवादास असे आढळले की, अभिलेखावर उपलब्ध असलेल्या पुराव्यांद्वारे असे दिसते की, श्री. फर्नांडिस यांच्या कबुलीत, पुरावा नोंदविण्याच्या टप्प्यावर देखील त्यांनी मान्य केले आहे की, ते उर्वरित मोबदला अदा करण्याच्या स्थितीत नाहीत.

१८) अशा परिस्थितीत, माननीय सर्वोच्च न्यायालयाने **संगयाँग इंजिनिअरिंग आणि कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड विरुद्ध नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणात आणि या न्यायालयाने **युनियन ऑफ इंडिया विरुद्ध रेकॉन, मुंबई** (उपरोल्लेखित) या प्रकरणात विशद केल्याप्रमाणे, श्री. फर्नांडिस यांच्याविरुद्ध विद्वान लवादाने काढलेले निष्कर्ष हे

‘भारताचे सार्वजनिक धोरण’ किंवा ‘उघड अवैधता’ या निष्कर्षांच्या कसोटीवर हस्तक्षेप करण्यासाठी कोणत्याही कारणाचा आधार देत आहेत, असे म्हटले जाऊ शकत नाही.

१९) खरे तर, विद्वान लवादाने काढलेल्या निष्कर्षांचा रोख अशा अर्थाचा आहे की, श्री. फर्नांडिस हे कसूरदार आहेत. या न्यायालयास सदर निष्कर्षांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी कोणतेही कारण सापडत नाही आणि म्हणूनच श्री. फर्नांडिस यांच्या विनंतीनुसार दिनांक ६ ऑक्टोबर, २००३ चे नोंदणीकृत कराराचे विनिर्दिष्ट पालनाची प्रार्थना फेटाळून, निवाड्याच्या परिणामक भागातील प्रथम निर्देश/ निष्कर्ष यामध्ये हस्तक्षेप करता येणार नाही.

२०) उत्तरवादीने दाखल केलेल्या याचिकेच्या संबंधात, विशेषतः आक्षेपित निवाड्यामधील परिणामक भागातील दुसरे निर्देश रद्द करण्याची मागणी करतांना, सर्वोच्च न्यायालयाने आणि या न्यायालयाने नमूद केलेल्या कसोट्या लागू करावयाच्या आहेत. आक्षेपित निवाड्याचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, विद्वान लवाद, असे आढळल्यानंतर की, श्री. फर्नांडिस हे कसूरदार आहेत आणि ते सदर कराराच्या विनिर्दिष्ट पालनासाठीचा दिलासा मिळण्यासाठी पात्र नाहीत, सदर रकमेचा परतावा करण्यासाठीचे निर्देश देऊ शकले नसते. सदर निर्देश हे केवळ दिनांक ०६ ऑक्टोबर, २००३ रोजीच्या करारामधील कलमातील चौकटींतर्गतच मान्य केले जाऊ शकत होते.करारातील संबंधित कलम हे खालील प्रमाणे वाचावे :-

> “ जर विक्रेत्याने केलेल्या हेतुपूर्वक चुकीमुळे विक्री पूर्ण झाली नाही तर खरेदीदार हा (अ) सदर करारांतर्गतचा विक्रेता याच्याकडून विनिर्दिष्ट पालन

करून घेणेस किंवा (ब) सदर इसारा रकमेवर किंवा ठेवीवर द.सा.द.शे. १८% दराने विक्रेत्याने व्याज देण्याच्या आणि खरेदीदाराने केलेला सर्व किंमत, शुल्क, खर्च आणि त्याला झालेले नुकसान आणि क्षती यासह सदर इसारा रक्कम मिळण्यासाठी, पात्र असेल.

जर खरेदीदाराने हेतुपूर्वक चूक केल्यामुळे खरेदी पूर्ण झाली नाही तर (अ) विक्रेता हा सदर कराराचे विनिर्दिष्ट पालन करून घेण्यासाठी आणि सर्व किंमत, शुल्क आणि खर्च जो विक्रेत्याने केला आहे आणि त्याला झालेले नुकसान आणि क्षती यांबद्दल दावा करण्यास किंवा (ब) इसारा रक्कम किंवा ठेवी जप्त होण्यास आणि त्याला झालेले सर्व नुकसान आणि क्षती याबद्दल दावा करणेस आणि विक्रेत्याने सोसलेले सर्व खर्च परत मिळण्यासाठी, पात्र असेल."

२१) उपरोक्त उद्धृत केलेल्या दोन कलमांपैकी दुसऱ्या कलमात विशेषतः अशी तरतूद आहे की, जर खरेदीदार म्हणजेच श्री. फर्नांडिस हे कसूरदार असतील आणि व्यवहार हा पूर्ण झाला नसेल तर उत्तरवादी हे एकतर कराराच्या विनिर्दिष्ट पालनाची मागणी करू शकतात किंवा इसारा रक्कम किंवा ठेवीची रक्कम जप्त होईल. विद्वान लवादाने आक्षेपित निवाड्यामध्ये दिनांक ६ ऑक्टोबर, २००३ च्या करारामधील सदर विशिष्ट कलमाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. वर उद्धृत केलेल्या कलमावरून हे स्पष्ट होते की, जर उत्तरवादी कसूरदार असते तर श्री. फर्नांडिस हे एकतर

कराराच्या विनिर्दिष्ट पालनाची मागणी करू शकले असते किंवा इसारा रकमेची किंवा ठेवींची द.सा.द.शे १८% दराने व्याजासह परतफेडीची मागणी करू शकले असते.

२२) प्रस्तुत प्रकरणात, विद्वान लवादास असे आढळले की, श्री. फर्नांडिस हे कसूरदार आहेत आणि त्यांनी परतफेडीचे निर्देश मंजूर करून घेतले आणि व्याजाच्या प्रश्नावर त्यांनी द.सा.द.शे १८% दराचा संदर्भ घेतला, जो कलमामध्ये नमूद होता आणि जेथे उत्तरवादी हे कसूरदार आढळून येतील, त्या परिस्थितीशी संबंधित होता.त्यामुळे विद्वान लवादाचा दृष्टिकोन हा उपरोक्त उद्धृत कराराच्या दोन कलमांच्या विरुद्ध होता.विद्वान लवादाने, उत्तरवादींनी असा दावा केला होता की, कोणतीही रक्कम दिली गेली नव्हती, पण पुरावे असे दर्शवतात की, त्यांना काही रक्कम अदा केली गेली होती, या आधारावर उत्तरवादींविरुद्ध असा निर्णय देऊन चूक केली आहे.विद्वान लवादाने कराराच्या अटींनुसार आणि स्वतः काढलेला निष्कर्ष की, श्री. फर्नांडिस हे कसूरदार आहेत, या पार्श्वभूमीवर काटेकोरपणे निष्कर्ष काढणे गरजेचे होते.माननीय सर्वोच्च न्यायालयाने **संगयाँग इंजिनिअरिंग आणि कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड विरुद्ध नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणात आणि या न्यायालयाने **युनियन ऑफ इंडिया विरुद्ध रेकॉन, मुंबई** (उपरोल्लेखित) या प्रकरणात विशद केलेल्या कसोटीनुसार, असा दृष्टिकोन एका कारणास असा निर्णय देण्यासाठी उद्युक्त करतो की, आक्षेपित निवाडा 'उघड अवैधतेच्या' दोषाने ग्रासित आहे. जरी अधिकार क्षेत्राची व्याप्ती संकुचित झाली असली तरी, दुरुस्ती नंतरचा कायदा विचारात घेतला पाहिजे, प्रस्तुत प्रकरणात, उत्तरवादी हे आक्षेपित निवाड्याच्या परिणामक

भागात दिलेल्या दुसऱ्या निर्देशात हस्तक्षेप करण्यासाठी 'उघड अवैधता' असल्याचे कारण दाखवण्यात यशस्वी झाले आहेत.

२३) उत्तरवादींतर्फे उपस्थित विद्वान वकील यांना सुद्धा सदर कायद्याच्या कलम २८(२) आणि (३) यांचा संदर्भ घेणे उचित वाटत आहे. विद्वान लवादाने, श्री. फर्नांडिस यांच्या बाजूने परताव्याचे निर्देश का पारित केले जाऊ शकतात, या कारणांवर चर्चा करतांना, समन्यायाच्या तत्वाशी सुसंगत असणाऱ्या एका दृष्टिकोनाचा स्वीकार केला.परंतु, दिनांक ६ ऑक्टोबर, २००३ रोजीच्या कराराच्या उपरोक्त उद्धृत अटींमध्ये समन्यायाचे तत्व लागू करण्यास काही वाव नव्हता, आणखी की, जेव्हा पक्षकारांनी या कायद्याचा कलम २८(२) अंतर्गत 'जे न्यायसंगत किंवा योग्य असेल' किंवा 'मध्यस्थी' म्हणून सदर प्रकरणावर निर्णय देण्यासाठी विद्वान लवादास प्राधिकृत केले नव्हते. या संदर्भात, उत्तरवादीतर्फे उपस्थित विद्वान वकील यांना या न्यायालयाने **बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया विरुद्ध डेक्कन क्रोनिकल होल्डिंग्स लिमिटेड** (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये दिलेल्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवणे उचित वाटले आहे, ज्याचा संबंधित भाग हा खाल्ल्याप्रमाणे आहे :-

> "२३२. श्री मेहता यांनी असा निर्देश केला की, 'न्यायसंगत' आणि 'मध्यस्थी' या संज्ञांना एक विशिष्ट कायदेशीर अर्थ आहे.पहिल्याचा अर्थ हा 'जे न्यायसंगत (किंवा फक्त) आणि योग्य आहे' असा आहे.निर्णयकर्ता (विशेषतः आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये) ज्यास जे न्यायसंगत किंवा योग्य

असेल यावर निर्णय देण्यासाठी प्राधिकृत केले आहे आणि जो कायदेशीर नियमांना बांधील नाही आणि त्याऐवजी न्यायसंगत तत्त्वांचे पालन करू शकतो.लवाद कायद्यामध्ये मध्यस्थी हा एक दुवा आहे, ज्यास पक्षकारांच्या मतैक्याने त्यांच्यामधील विवाद हे जे न्यायसंगत आणि योग्य असेल या आधारावर सोडविण्यासाठी अधिकार प्रदान केले आहेत.

२३३. लवाद कायद्यामधील शब्दरचना पाहता, या संज्ञांचे पूर्वीपासून प्रचलित असलेले सखोल परीक्षण हे अनावश्यक आहे. संविधी स्वतःच स्पष्ट आणि असंदिग्ध आहे आणि असोसिएट बिल्डर्स या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने परिच्छेद ४२.३ मध्ये कलम २८ चा उतारा घेतला आहे आणि असे म्हटले आहे की, त्याचे उल्लंघन हे उघड अवैधतेचे उपशिर्ष आहे.संगयाँग इंजिनियरिंग प्रकरणाने ही स्थिती बदललेली नाही.कायद्यातील ही आता स्थापित झालेली स्थिती पाहता, ज्यावर श्री मेहता यांनी भिस्त ठेवली आहे, त्या अतिरिक्त अधिकारांचे परीक्षण सर्व समान परिणामांसाठी अनावश्यक आहे. त्यांनी असेही म्हटले आहे की, व्यावसायिक लवाद यांना लवाद करारामध्ये विशिष्ट अधिकारांच्या अनुपस्थितीत त्यांनी कल्पिलेले ‘निष्पक्ष आणि वाजवी’ हे तत्व लागू करून विवाद सोडविण्याचा अधिकार नाही. कलम २८ (३) मध्ये लवाद न्यायाधिकरणास निवाडा करतांना आणि

त्यावर निर्णय देतांना कराराच्या अटी विचारात घेण्याचे देखील आदेश दिले आहेत.कलम २८ हे लवाद न्यायाधिकरणासमोर प्रलंबित असलेल्या कार्यवाहीच्या प्रत्येक टप्प्यावर लागू केले आहे आणि केवळ निवाडा देतांना नाही. कलम २८(२) अंतर्गत लवाद न्यायाधिकरणाने त्यांच्या अनुसार जे न्यायसंगत आणि योग्य असेल तेव्हा किंवा केवळ मध्यस्थीच्या स्वरूपात तेव्हाच निवाडा करावा जेव्हा पक्षकारांनी त्यांना असे करण्यास प्राधिकृत केले असेल. लवाद हे संविदात्मक कलमांची अंमलबजावणी करण्यास बांधील असेल आणि त्यांच्या विरुद्ध जाऊ शकत नाही. जोपर्यंत करार त्यांना तसे करण्यास मुभा देत नाही, तोपर्यंत ते आपल्या समन्यायाच्या कल्पनेवर आणि निष्पक्षपातीपणावर आधारित निवाडा देऊ शकत नाहीत."

२४) उत्तरवादी तर्फे उपस्थित विद्वान वकील यांना या न्यायालयाने **विलायती राम मित्तल प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध रिझर्व बँक ऑफ इंडिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणात दिलेल्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवणे उचित वाटले आहे, ज्यामध्ये या न्यायालयाने निर्णय दिला की, जर एखाद्या कराराच्या कलमामुळे विशिष्ट परिणाम अनिवार्य केला असेल आणि लवादाने त्याच बाजूने निर्देश निर्गमित केले असतील आणि तो त्याच्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादेपलीकडील असेल या कारणासाठी की, विद्वान लवाद हा पक्षकारांमधील कराराचा एक दुवा आहे आणि तो त्यामध्ये नमूद केलेल्या विशिष्ट अटींकडे दुर्लक्ष करू शकत नाही. या न्यायालयास खात्री पटली

आहे की, प्रस्तुत प्रकरणात, विद्वान लवादाने अधिकार क्षेत्राचे उल्लंघन केले आहे, जे त्यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २००३ रोजी पक्षकारांमध्ये झालेल्या कराराच्या अटींमधून मिळवले आहे. त्यामुळे, उत्तरवादींची आक्षेपित निवाड्यावर दिलेला दुसरा निर्देश रद्द करण्याची मागणी ही उचित आहे.

२५) वर नमूद केल्याप्रमाणे, जेव्हा पृथक्करणीयतेचा सिद्धांत लागू केला जाऊ शकतो, तेव्हाच निवाडा हा अंशतः रद्द करणे उचित आहे.या न्यायालयाचे असे मत आहे की, सदर सिद्धांत लागू करतांना, आक्षेपित निवाडा हा अंशतः रद्द करण्यास पात्र आहे, जोवर निर्देश क्र. II चा संबंध आहे, तोवर निवाड्याचा उर्वरित भाग कायम केला जाऊ शकतो.

२६) वरील दृष्टिकोनातून लवाद याचिका क्रमांक ३५५/२०२२ ही फेटाळण्यात येत आहे आणि विनिर्दिष्ट पालनासाठीची मागणीची प्रार्थना फेटाळून लावत निर्देश क्रमांक I हा टिकवून ठेवण्यात आणि कायम करण्यात येत आहे.उत्तरवादींनी दाखल केलेली लवाद याचिका (एल) क्रमांक २४२१७/२०२२ ही मंजूर करण्यात येत आहे आणि आक्षेपित निवाडा हा केवळ निर्देश क्रमांक II च्या मर्यादेपर्यंत, ज्याद्वारे उत्तरवादींना द.सा.द.शे. ८% दराने व्याजासह रक्कम रुपये ६,५०,०००/- श्री. फर्नांडिस यांना अदा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अंशतः रद्द करण्यात येत आहे.

२७) याचिका निकाली काढण्याच्या दृष्टीने जर काही अर्ज प्रलंबित असतील तर ते निकाली काढले असे समजले जाईल.खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

**(न्या. मनिष पितळे)**

x-x-x-x

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x